98

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर    **P.S.(ठाणे):** बेगमपूरा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0056    **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/03/2023 03:20

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार    **Date From (दिनांक पासून):** 13/03/2023
   **Time Period (कालावधी):** पहर 7    **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/03/2023
   **Time From (वेळेपासून):** 19:46 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 19:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/03/2023    **Time (वेळ):** 03:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 005

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/03/2023 03:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 2 किमी    **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भडकल गेट समोरील, नवखंडा कलेज,जुबली पार्कच्या चहाचे टपरीच्या,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** बेगमपूरा

**District(State) (जिल्हा(राज्य)):** औरंगाबाद शहर(महाराष्ट्र)



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मोसीन जानी पठाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1984

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोलठाणवाडी रोड, खत्रीनगर, हर्सुल ,औरंगाबाद,बेगमपूरा,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोलठाणवाडी रोड, खत्रीनगर, हर्सुल ,औरंगाबाद,बेगमपूरा,औरंगाबाद शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9021575215

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमरसिंह भजणसिंह ठाकुर | | | 1. न्यू पहाडसिंगपूरा, अमोदी हिल, , ई-8,औरंगाबाद,बेगमपूरा, औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी मोसीन जानी पठाण, वय -39 वर्ष, व्यवसाय - प्लॉटींग व कंन्सट्रक्शन, रा. कोलठाणवाडी रोड, खत्रीनगर, हर्सुल औरंगाबाद मो.नं. 9021575215
मी दिनांक 08/03/2023 रोजी पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी मॅडम यांचेकडे दोन पंचा समक्ष तक्रार दिली होती की, मी वरील प्रमाणे असुन प्लॉटींग व कंन्स्ट्रक्शनचा व्यापार करतो. दिनांक 02/02/2023 रोजी तक्रारदार नुरजहा अरमान खान रा.प्लॅट नं. 202 मोर्या प्राईड, मयुर पार्क औरंगाबाद यांनी पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर येथे माझ्या विरुध्द खोटी तक्रार दिली असुन सदर तक्रारीचे अनुषंगाने माझे विरुध्द पोलीस स्टेशन सिटीचौक औरंगाबाद शहर येथे गु.र.नं.48/2023 कलम 354,354 ड, 324,323,504,34 भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस स्टेशन सिटीचौक, औरंगाबाद शहर येथील सहायक फौजदार श्री अमरसिंह ठाकुर यांचेकडे देण्यात आला आहे.
त्या अनुषंगाने मला सहायक फौजदार श्री.ठाकुर यांनी दिनांक 03/02/2023 रोजी पोलीस स्टेशन सिटीचौक येथे बोलावुन घेतले व माझ्यावर कारवाई करण्यात आली आहे. सदर वेळी सहायक फौजदार श्री.ठाकुर यांनी माझ्याकडुन माझ्या पत्नी मार्फत मला टेबल जामीन देतो व गुन्हयात मदत करतो तसेच लवकरात लवकर मा. न्यायालयात चार्जशिट दाखल करतो म्हणुन 2,000/- रुपये घेतले होते. त्यानंतर दिनांक 22/02/2023 रोजी पुन्हा पोलीस स्टेशन सिटीचौक येथे बोलावुन घेतले व पुन्हा माझ्याकडुन 2,000/- रुपये घेतले होते. सदर गुन्हयात माझ्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे व सध्या मी जामीनावर आहे.
आज दिनांक 08/03/2023 रोजी मला सहायक फौजदार श्री.ठाकुर यांनी तुमचे चार्जशिट मा.न्यायालयात पाठवायचे आहे लवकर पाठवायचे असल्यास मला येवुन भेटा असे सांगीतले आहे. तसेच ते मला माझ्याविरुध्द पोलीस स्टेशन सिटीचौक येथे दाखल असलेल्या व त्यांच्याकडे तपास असलेल्या गुन्हयात मदत करणे व मा. न्यायालयात चार्जशिट दाखल करणे कामी आणखी वीस ते पंचवीस हजार दयावी लागतील अशी लाचेची मागणी करीत आहे. मला त्यांना सदर कामासाठी लाच देण्याची इच्छा नाही. त्यांचेशी माझा पैशाचा देण्याचा-घेण्याचा किंवा उसनवारीचा कोणताही व्यवहार नाही किंवा वैर दुष्मनी नाही.
मला सहायक फौजदार श्री.ठाकुर यांनी पोलीसस्टेशन सिटीचौक येथे बोलविल्यामुळे मी त्यांची भेट घ्यायला जाणार आहे त्यावेळी सहायक फौजदार श्री. अमरसिंह ठाकुर यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझ्याकडे वरील कामासाठी जर पैसे मागितले व ते मागणी केलेले पैसे स्विकारले तर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.
माझ्या वरील तक्रारीवरुन अनुषंगाने पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी यांनी पंच व आमच्या सर्वानुमते पैशाची मागणी होते किंवा कसे याची पडताळणी करण्याचा निर्णय दिनांक 08/03/2023 रोजी घेऊन आम्हा सर्वांना सापळा कारवाईच्या बाबत सुचना देऊन माहीती दिली.
त्यानंतर माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन देऊन पंच क्र.1 श्रीमती बन्सवाल, तसेच माझी पत्नी नामे आसीया यांना सोबत घेऊन माझ्या कडील खाजगी मोटारसायकलने पो.स्टे सिटीचौक येथील पोलीस श्री.अमरसिंग ठाकुर यांचे भेटी करीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच क्र.1 श्रीमती बन्सवाल,पत्नी आसीया असे पो.स्टे.सिटीचौक येथील पोलीस श्री.ठाकुर यांची जिल्हाधिकारी कार्यालया समोर एका दुकानात भेट घेतली. त्यावेळी भेटी दरम्यान पंच क्र. 1 श्रीमती बन्सवाल यांचे समक्ष श्री ठाकुर पोलीस यांच्याकडे माझे विरुध्द तपास कामी पो.स्टे.सिटीचौक औरंगाबाद शहर येथे दाखल गु.र.नं.48/2023 कलम 354,354 ड, 324,323,504,34 भा.द.वि. गुन्हयात मदत करणे व झाले तपासाचे चार्जशिट मा.न्यायालयात लवकर सादर करणे कामी माझ्याकडे वीस ते पंचवीस हजार रुपये पैशाची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना तडजोड करुन दहा ते पंधरा हजार रुपये देण्याचे सांगितले त्यानंतर त्यांनी विचारले की, अभी दे रहे क्या? असे म्हणुन श्री. ठाकुर पोलीस यांनी लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले, त्यानंतर मी नंतर आणून देतो असे सांगून निघून आलो. श्री.ठाकुर पोलीस यांनी



Scanned with OKEN Scanner

माझ्याकडे मागणी केलेली रक्कम आज दिनांक 13/03/2023 रोजी उपलब्ध झाल्यानंतर दहा हजार रुपये ज्यामध्ये पाचशे रुपये दराच्या वीस चलनी नोटा पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी मॅडम यांचेकडे हजर केले व त्यांना सांगितले की, श्री. ठाकुर पोलीस यांनी मला सदर लाचेची रक्कम दिल्ली गेट पोलीस चौकी येथे बोलविले आहे. त्यानंतर पोलीस निरीक्षक शुभांगी सुर्यवंशी मॅडम यांनी त्या नोटांचे नंबर घेऊन त्या नोटांना त्यांच्या पथकातील पोलीसाकडुन पंचासमक्ष पावडर (ॲन्थ्रॉसीन पावडर) लावुन माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवुन दिल्या. त्यानंतर पंच क्र.1 श्रीमती बन्सवाल व माझी पत्नी आसीया यांच्यासह माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर चालु करुन दिला. त्यानंतर मी व पंच क्र.1 श्रीमती बन्सवाल, माझी पत्नी आसीया असे माझ्या खाजगी वाहनाने श्री.ठाकुर पोलीस यांचे भेटी करता दिल्ली गेट पोलीस चौकी येथे गेलो. त्या ठिकाणी पोहोचल्यावर श्री. ठाकुर यांना फोन केला असता त्यांनी आम्हांला भडकल गेट समोरील नवखंडा कॉलेज, जुबली पार्कच्या चहाच्या टपरीच्या बाजुला बोलावले. त्यानुसार मी व पंच क्र.1 बन्सवाल सह पोलीस श्री. ठाकुर यांची भेट घेऊन माझे कामाबाबत बोललो आमच्या चर्चेदरम्यान ये दस लाया मैने,, दस हजार है,, ये रख लो.. तर त्यांनी अं..असे म्हणाले तर त्यांना मी इसे गिनलो पहिले तुम,, कित्ते है गिनलो,, कित्ते है? तेव्हा त्यांनी दस हजार असे म्हणुन माझ्याकडुन पंचासमक्ष एकुण रक्कम दहा हजार रुपये लाच रक्कम, ज्यात पाचशे रुपये दराच्या वीस चलनी नोटा अन्थ्रासिन पावडर लावलेल्या माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरले असता त्यांनी ते पैसे त्यांच्या उजव्या हाताने घेऊन दोन्ही हातांनी मोजून त्यांनी अंगात घातलेल्या पोलीस ड्रेसच्या खाकी रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशात ठेवल्या..त्यानंतर मी पुर्वनियोजीत ठरलेला इशारा केला ती वेळ 19.46 वाजेची होती. माझ्या इशाऱ्या नंतर लगेचच सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी हजर आले. त्यांनी सहायक फौजदार श्री. ठाकुर यांना ताब्यात घेतले त्यांना सापळा पथकाचा परिचय देवून त्यांचे नांवगांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अमरसिंह भजणसिंह ठाकुर वय 50 वर्षे सहायक फौजदार नेमणूक सिटी चौक पोलीस स्टेशन औरंगाबाद शहर रा.न्यू पहाडसिंगपूरा, अमोदी हिल, ई-8, औरंगाबाद असे सांगितले त्यांना स्विकारलेल्या लाच रकमेबाबत विचारता श्री. ठाकुर पोलीस यांनी लाच रक्कम त्यांचे अंगातील खाकी रंगाच्या पॅन्टच्या समोरील उजव्या खिशातील दहा हजार रुपये ज्यामध्ये 500/- रुपये दराच्या वीस चलनी नोटा असे पंचासमक्ष काढुन दिले.

तरी दिनांक 13/03/2023 रोजी भडकल गेट समोरील, नवखंडा कॉलेज, जुबली पार्कच्या चहाचे टपरीच्या बाजुला 19.46 वाजता अमरसिंह भजणसिंह ठाकुर, वय 50 वर्षे सहायक फौजदार नेमणूक सिटी चौक पोलीस स्टेशन औरंगाबाद शहर यांनी माझ्याकडे माझे विरुध्द सिटीचौक पोलीस स्टेशन येथे दाखल असलेल्या गुन्हयात मदत करणे तसेच मा. न्यायालयात चार्जशिट दाखल करणे कामी वीस ते पंचवीस हजार रुपयांची मागणी करुन तडजोडी अंती दहा हजार रुपये पंच क्र.1 बन्सवाल यांचे समक्ष स्वत: स्विकारले. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द कायदेशिर फिर्याद आहे. तरी ठाकुर पोलीस यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर मराठीत टाईप केली असुन ती मी वाचुन पाहिली बरोबर व खरी आहे.

गुन्हा दाखल अधिकारी - DO पो.उप.नि भालेराव गुन्हा तपास आधिकारी - पो.नि शुभांगी सुर्यवंशी ने ला.प्र. वि.औरंगाबाद

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)
VINOD PRABHAKAR BHALERAO
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): dgpvpbm8603
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ड्युटी ऑफीसर
पो.स्टे. वेगमपुरा
औरंगाबाद (शहर)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vitthal Subhashrao I

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): PI



Scanned with OKEN Scanner